MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१० | शुक्रवार दि.२७ सप्टेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -10 | FRIDAY DT.27 SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |


## बिबट्याचा वावर;नागरिक भयभीत अन् वनविभागाकडुन रात्रीची पेट्रोलिंग !

आष्टी (प्रतिनिधी)

दोन पिलांना जन्म दिलेल्या बिबट्या मादीचे परिसरात वावर असून यामुळे नागरिक भयभीत झाल्याने वनविभागाकडुन आता रात्रीची पेट्रोलिंग सुरू करण्यात आल्याची माहिती वनविभागाकडुन मिळाली आहे. आष्टी तालुक्यातील लिंबोडी येथे गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याचे वास्तव्य असून या बिबट्या मादीने दोन पिलांना जन्म दिला आहे.ही मादी परिसरात भटकंती करत असून आज पर्यंत तीन चार शेळ्याचा फडशा पाडला आले.त्यानंतर गावात वनविभागाकडुन पाहणीसह पंचनामा करण्यात आला.पण आता बिबट्याच्या धास्तीने ग्रामस्थ भयभीत झाले असल्याने पिजरा लावून बिबट्याला जेरबंद करावी अशी मागणी करण्यात येत आहे.तर खबरदारी म्हणून वनविभागाकडुन रात्रीच्या दरम्यान पाच कर्मचारी व एक वाहन दिमतीला देऊन पेट्रोलिंग सुरू केली आहे. याबाबत आष्टीचे वनपरिक्षेत्र अधिकारी संजय ढगे यांना विचारणा केली असता ते म्हणाले की,बिबट्यावर नजर ठेवण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून रात्रीची पेट्रोलिंग सुरू करण्यात आली आहे. नागरिकांनी दक्ष राहण्याचे आवाहन देखील करण्यात आले आहे.

# एका पोस्टरवर मनोज जरांगे, दुसऱ्या पोस्टरवर पंकजा मुंडे

## बीडच्या भाजप जिल्हाध्यक्षांच्या दोन भूमिका चर्चेत

बीड : मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांची भाजप आणि फडणवीस यांच्या संदर्भातली भूमिका स्पष्ट आहे. मराठवाड्यात तर भाजप विरुद्ध मनोज जरांगे पाटील असा संघर्ष पाहायला मिळतो. मात्र बीडचे भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी आयोजित केलेल्या बैलगाडा शर्यतीच्या बॅनर्सवर मनोज जरांगे पाटील यांचा फोटो पाहायला मिळत आहे. त्याचवेळी पंकजा मुंडे आणि इतर भाजप नेत्यांसोबत एक वेगळं बॅनर लावल्याचं दिसतंय. त्यामुळे भाजपच्या जिल्हाध्यक्षाने एकाचवेळी दोन भूमिका मांडल्यामुळे बीडमध्ये हा चर्चेचा विषय बनला आहे.

बीडचे भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी आयोजित केलेल्या बैलगाडा शर्यतीचे बॅनर्स चांगलेच गाजत आहेत. कारण एका पोस्टरवर त्यांनी मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे यांच्यासोबत फोटो लावला आहे. तर दुसऱ्या पोस्टरवर त्यांनी भाजपच्या नेत्या पंकजा यांचा फोटो लावल्याचं दिसतंय. त्याचसोबत भाजपच्या इतर नेत्यांचे फोटो त्यांनी त्यावर लावले आहेत. तर मनोज जरांगे यांच्यासोबत लावलेल्या पोस्टरवर राजकीय नेत्याव्यतिरिक्त इतर नेत्यांचे फोटो लावले आहेत. त्यामुळे त्यांचे हे दोन्ही पोस्टर्स चांगलेच चर्चेत आले आहेत.







राजेंद्र मस्के यांनी पंकजा मुंडे यांच्यासाठी वेगळे बॅनर तयार करून त्यावर भाजपच्या नेत्यांचे फोटो टाकले आहेत. एकाच वेळी दोन भूमिका भाजपच्या जिल्हाध्यक्षांनी मांडल्यामुळे बीडमध्ये हा चर्चेचा विषय बनला आहे. या आधीही मनोज जरांगे यांची भेट घेतली होतीबीड भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी या आधीही मनोज जरांगे यांची भेट घेतली होती. ते बीड विधानसभा निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत. राजेंद्र मस्के हे पंकजा मुंडेंचे खंदे समर्थक आहेत. या आधी राजेंद्र मस्के यांनी मराठा आरक्षणावर आक्रमक भूमिका घेतली होती. सरकारने पळपुटा करू नये, मराठा समाजाला आरक्षण द्यावं अशी भूमिका त्यांनी घेतली होती.

### मनोज जरांगे फॅक्टर विधानसभेत महत्त्वाचा

लोकसभा निवडणुकीवेळी मनोज जरांगे यांनी घेतलेल्या भूमिकेचा भाजपला जोरदार फटका बसला होता. त्यामध्ये पंकजा मुंडे यांचाही पराभव झाला होता. आता तोच फॅक्टर पुन्हा एकदा विधानसभेसाठी चालण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे धनंजय मुंडे यांनीही मनोज जरांगे यांची भेट घेतल्याची चर्चा होती.



## मांजरा धरणाचे आ. नमिता मुंदडा यांनी केले जलपूजन


अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मांजरा धरण पूर्ण भरल्याने या परिसरातील शेतकऱ्यांसाठी दिलासा आहे. तर अनेक ठिकाणच्या पाणी पुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागला. दर वर्षी धरण भरले तर सिंचनाचा प्रश्न मार्गी लागेल. असे प्रतिपादन केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी केले. गुरुवारी सकाळी आ. नमिता मुंदडा यांनी धनेगाव येथील मांजरा धरण पूर्ण भरल्याने या ठिकाणी भेट दिली. व जलपूजन केले. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा, शेख रहीमभाई, दिलीपराव भिसे, भगवान केदार, सुनील गलांडे, सारंग पुजारी, संजय गंभीरे, यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना नमिता मुंदडा म्हणाल्या की मध्यंतरी एक वर्ष धरण न भरल्याने या परिसरात सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र आता या वर्षी चांगला पाऊस पडल्याने व धरण भरल्याने सिंचन व पाणी पुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागला आहे आ. नमिता मुंदडा यांनी सांगितले.

### मुंडे साहेबांचा ड्रीम प्रोजेक्ट पंकजाताई आणि प्रितमताईंच्या प्रयत्नांमुळेच साकार होत आहे

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार , आमदारांनी रेल्वेचे श्रेय घेण्याची नौटंकी थांबवावी - सलीम जहाँगीर







बीड (प्रतिनिधी)

देशात ७० वर्ष एक हाती सत्ता असताना काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसला बीडच्या रेल्वेसाठी साधी एक वीट सुद्धा आणता आली नाही. आता मात्र आयत्या पिठावर रेघोट्या याप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खासदार आणि आमदार मागे पुढे करत बैठका घेऊन चमकोगिरी करू लागले आहेत. परळी-बीड - अहमदनगर हा रेल्वेमार्ग दिवंगत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. भाजप नेत्या आ. पंकजाताई मुंडे आणि माजी खा.प्रितमताई मुंडे यांच्या प्रयत्नामुळेच जिल्हावासियांचे रेल्वेचे स्वप्न साकार होत आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार - आमदारांनी ही नौटंकी थांबवावी असे पत्रक भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

बीड जिल्ह्यातील परळी -बीड - अहमदनगर रेल्वे मार्गाचा प्रोजेक्ट हा भाजपचे दिवंगत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. त्यामुळेच मुंडे साहेब खासदार झाल्यापासून बीडला रेल्वे यावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले. मुंडे साहेबांच्या निधनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीमध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी हे बीडला आले होते. त्यावेळी त्यांनी जाहीर सभेत सांगितले होते की, बीडला रेल्वे यावी हे मुंडे साहेबांची स्वप्न होते आणि ते स्वप्न आम्ही पूर्ण करणार असा शब्द नरेंद्र मोदी यांनी दिला होता. जिल्हावासियांच्या दृष्टीने हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा असल्याने भाजप नेत्या पंकजाताई मुंडे यांनी स्वतः या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केला. तर तत्कालीन खासदार प्रितमताई मुंडे यांनी देखील देशाच्या संसदेत हा प्रश्न मांडून प्रामुख्याने जास्तीत जास्त निधी बीडच्या रेल्वेसाठी कसा मिळेल यासाठी प्रयत्न केले. त्यामुळेच आज आष्टी - अंमळनेर पर्यंतचा रेल्वे मार्ग पूर्ण झाला असून बीड शहरापासून काही अंतरावर हे काम युद्धपातळीवर सुरू आहे ते केवळ पंकजाताई आणि प्रितमताई यांच्यामुळेच. त्यांनी केलेल्या प्रयत्नांची पराकाष्ठा म्हणून आज जिल्हावासियांना रेल्वे पाहायला मिळत आहे. मात्र काल परवा निवडून आलेल्या लोकांना हे सर्व काही आमच्यामुळेच झाले आहे असेच वाटू लागले आहे. त्यामुळेच अर्ध्या हळकुंडात पिवळे होऊन ते पुढे मागे करत चमकोगिरी करण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. आम्ही बीडचा रेल्वेसाठी खूप काही केले आहे असे दाखवण्याचा केविलवाना प्रयत्न त्यांच्याकडून होऊ लागला आहे. मात्र जिल्ह्याची जनता सुजाण आहे. कोण खरं, कोण खोटं हे ते जाणून आहेत. त्यामुळे जनता आशा चमकोगिरी करणाऱ्या आणि बैठका घेऊन नौटंकीचा प्रयत्न करणाऱ्यांना कधीच थारा देणार नाही

# गोदावरी नदीत पाण्याचा विसर्ग वाढला गोदाकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : मराठवाड्यात मागील दोन दिवसांपासून पावसाचा जोर वाढला असून जायकवाडी धरणातून मोठा विसर्ग सुरु आहे. परिणामी गोदावरी नदीपात्रात पाणी वाढलं आहे. हेच पाणी सध्या गेवराई तालुक्यातील राक्षस भवनपर्यंत पोहोचले आहे. दरम्यान राक्षस भवन येथील सर्व मंदिरे पाण्याखाली गेली आहेत. मागील दोन दिवसांपासून बीड जिल्ह्यात सर्वदूर मुसळधार पाऊस कोसळतो आहे. अशातच जायकवाडी धरणातून देखील पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे गोदावरी नदीला मोठ्या प्रमाणात पाणी आलं आहे.

जायकवाडी धरणाची १८ दरवाजे उघडली

धरणक्षेत्रात जोरदार पाऊस झाल्यानं जायकवाडी धरणाची १८ दरवाजे महिनाभरात दुसऱ्यांना उघडण्यात आली. यामुळे जायकवाडी धरणातून मोठा विसर्ग गोदापात्रात सुरु असून गोदाकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, बीडचे राक्षसभवन येथे धरणाचे पाणी शिरले असून या भागातील सर्व मंदिरे पाण्याखाली गेली आहेत.

मंदिरं गेली पाण्याखाली

जायकवाडी धरणातून पाण्याचा मोठा विसर्ग सुरु असल्यानं गुळज येथील बंधाऱ्यातून पाणी गेवराईकडे सोडण्यात आले आहे. परिणामी राक्षस भवन येथील मंदिर पाण्यात गेल्याचं दिसून आलं. येत्या दोन दिवसातील पावसाची शक्यता लक्षात घेता तहसील प्रशासनाने गोदाकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देखील दिला आहे.

गोदाकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

जायकवाडी प्रशासनाने बुधवारी पाच वाजता २०९६ क्यूसेकने विसर्गात वाढ केली होती. त्यानंतर विसर्ग वाढवण्यात आला असून एकूण ११५२८ क्युसेकने विसर्ग गोदावरी पात्रात सुरू करण्यात आला होता. छत्रपती संभाजीनगरसह हजारो गावांची तहान जायकवाडीच्या पाण्याने भागते. याशिवाय औष्णिक वीज प्रकल्पाला तसेच शेती सिंचन जायकवाडीच्या पाण्यावर अवलंबून आहे. बुधवारी आधी सहा दरवाजे ०.५ फुटाने उघडण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा सहा दरवाजे उघडण्यात आले. त्यानंतर विसर्ग वाढवण्यात आला.

## राक्षसभुवनात पाणी शिरले सर्व मंदिरे पाण्याखाली



### किती भरले जायकवाडी धरण?

जायकवाडी धरण ९९.७८ टक्क्यांनी भरले असून जायकवाडीत पाण्याची पातळी १५२१ फुटांवर गेली आहे. धरणाच्या वरील भागात तसेच पाणलोट क्षेत्रात मुसळधार पावसाने पाण्याची मोठ्या प्रमाणावर आवक सुरू आहे. दरम्यान बुधवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास सहा दरवाजे उघडण्यात आले होते. त्यानंतर विसर्ग वाढवण्यात आला होता.

# मोहनदादा जगतापाच्या पाठीशी माजलगाव मतदारसंघात युवकाची मोठी ताकद उभा करणार - संभाजी दराडे

## कार्यकर्ता निर्धार मेळाव्यास उपस्थित रहा

वडवणी (प्रतिनिधी)

सर्व पदाधिकारी कार्यकर्ते तसेच बुथप्रमुख यांच्यासाठी येत्या २९ सप्टेंबर २०२४ रविवार रोजी माजलगाव मध्ये माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते मोहनराव जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य कार्यकर्ता निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मोहनराव जगताप मित्र मंडळाचे युवा नेते संभाजी दराडे यांनी केले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असेकी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते मोहनराव जगताप यांच्या माजलगाव विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी निर्धार नव्या पर्वाचा भव्य कार्यकर्ता निर्धार मेळावा येत्या २९ सप्टेंबर २०२४ रोजी रविवारी सकाळी ११ वाजता जुना मोंढा मैदान माजलगाव या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. माजलगाव विधानसभा मतदारसंघातील माजलगाव, वडवणी, धारूर तालुक्यातील सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच बुथप्रमुखांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन मोहनराव जगताप मित्र मंडळाचे युवा नेते संभाजी दराडे यांनी केले आहे.

माजलगाव मतदार संघातून आता विकासाला मतदान व्हावं यासाठी माजलगाव मतदारसंघातील जनता सर्व



जाती धर्मातील लोकांना सोबत घेणाऱ्या नेतृत्वाला म्हणजेच मोहन दादा जगताप यांना २०२४ चा माजलगाव मतदार संघाचा आमदार करणार आहे यासाठी माजलगाव मतदारसंघातील अठरापगड जातीतील युवकांची एक मोठी ताकद मोहन दादा जगताप यांच्या पाठीशी उभा करणार आहे असंही या युवा नेते संभाजी दराडे यांनी म्हटले आहे मोहन दादा जगताप हे सर्व धर्मांना सोबत घेऊन राजकारण समाजकारण करत आहेत त्यांच्या पाठीशी अठरापगड जातीची मोठी ताकतीची फळी उभा असताना मात्र आता यावेळी माजलगाव मतदारसंघांमध्ये जातीच्या राजकारणाला थारा न देता मोहनदादा जगताप यांना आमदार करण्यासाठी जनताच रस्त्यावर उतरलेली आहे असेही यावेळी संभाजीराजे यांनी म्हटले आहे

# आष्टी आगारातून अवेळी धावणाऱ्या बस बनल्या शालेय विद्यार्थ्यांच्या डोकेदुखी

## बसचे वेळापत्रक कोलमडले, आगार प्रमुखाचे दुर्लक्ष

आष्टी (प्रतिनिधी)

बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीद वाक्य घेऊन प्रवाशांच्या दिमतीला असलेल्या बस वेळेवर येऊन सुखरूप प्रवास व्हावा असे असताना नादुरुस्त बस व डिझेल अभावी अवेळी बस येत असल्याने प्रवासी व शालेय विद्यार्थी वैतागून गेले आहेत. तर आष्टी आगारातुन अवेळी बस धावत असल्याने प्रवाशांची डोकेदुखी बनली असल्याचे दिसुन येत आहे.

आष्टी आगारातून आडणारी शालेय विद्यार्थासाठी रोज बस धावतात. पण या बस धावत असताना अनेक बस नादुरुस्त असल्याने प्रवासा दरम्यान अचानक कुठेही बंद पडतात.पंचर होतात.खिडक्या, दरवाजे तुटलेली असल्याने प्रवाशी वेळेवर पोहतच नाहीत. त्यामुळे प्रवाशी व शालेय विद्यार्थीना ताटकळत थांबाव लागत.तर दुसरीकडे या बस कधीच वेळेवर सोडल्या जात नाही.की साधी चौकशी देखील केली जात नसल्याने प्रवाशाच्या सेवेकडे आगार प्रमुख याचे साफ दुर्लक्ष असल्याचे दिसुन येत आहे.वरिष्ठांकडून याची दखल घेऊन सर्व बस वेळेवर सोडण्यास येतील अशी समज आगार प्रमुखांना द्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शहादेव गर्जे यांनी केली आहे.

# भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात लोकनेते देवेंद्र फडणवीस यांचा सिंहाचा वाटा–ॲड.अजिंक्य पांडव

बीड (प्रतिनिधी)

आधुनिक महाराष्ट्राच्या विकासाचे जनक,सर्व समाजाचे महत्वाचे प्रश्न सोडवण्यात धाडसी, निर्णायक व कार्यक्षम भूमिका बजावणारे लोकनेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या काही वर्षांपासून प्रलंबित असणारा परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात सिंहाचा वाटा उचलला असून राज्यातील समस्त ब्राम्हण समाज त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करीत असल्याचे युवा नेते ॲड.अजिंक्य पांडव यांनी म्हंटले असून देवेंद्रजी यांच्याशिवाय परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन होउच शकले नसते असेही ठामपणे म्हंटले आहे.

ॲड.अजिंक्य पांडव यांनी एका पत्रकाद्वारे ब्राम्हण समाजासाठी आर्थिक विकास महामंडळाची मागणी कशी पुढे आली या संबंधीचा अनुभव सांगितला आहे. ॲड.पांडव यांनी पत्रकात म्हंटले आहे की,२०११ साली बीडच्या शासकीय विश्रामगृहात या जेष्ठ विचारवंत तथा वक्त्या अपर्णाताई रामतीर्थकर,परळीचे माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी,श्री दीपक रणनवरे संपादक श्री.दिलीप खिस्ती, श्री.संतोषजी मानुरकर, प्रा.चंद्रकांत मुळे,जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे, श्री.प्रमोद कुलकर्णी,डॉ.लक्ष्मिकांत बाहेगव्हाणकर,ॲड.रवींद्रजी देशमुख,श्री दिनेश लिंबेकर, श्री.शैलेश कुलकर्णी, श्री.मनोज जोशी,श्री.गोपाळ अहंकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत पत्रकार परिषद घेऊन अन्य मागण्या बरोबर प्रमुख मागणी म्हणून ब्राह्मण समाजातील गरजवंत आणि होतकरू तरुणांच्या साठी आर्थिक विकास महामंडळ व्हावे अश्या मागणीचा ठराव करण्यात आला आणि सरकार दरबारी पाठपुरावा करण्यासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन उभारण्याचे निश्चित करण्यात आले.त्या नंतर मराठवाडयात विविध ठिकाणावरून या मागणीस उचलून धरण्यात आले आणि ब्राह्मण समाजातील थोरा-मोठ्यांनीही या मागणी साठी शक्य त्या मार्गाने पाठपुरावा करणे निरंतर चालू ठेवले,विशेष म्हणजे याच वेळी बीडला आलेल्या श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज(कोल्हापूर) यांची व अपर्णाताई यांची प्रदीर्घ चर्चा झाली त्यात छत्रपतींनीही ब्राह्मण समाजाच्या आर्थिक उन्नती साठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे गरजेचे असल्याचे सांगून आपणही यासाठी शक्य ते प्रयत्न करू असे आश्वासन दिले होते.त्या नंतर छत्रपती संभाजी नगर, परभणी, जालना,हिंगोली,धाराशिव या जिल्ह्यातील आणि राज्यस्तरावर व्यापक संघटन असणाऱ्या ब्राम्हण समाजाच्या विविध संघटनांनी यथाशक्ती सहकार्य केले ,आंदोलन उभारले आणि ब्राह्मण समाजाचा आवाज बुलंद केला.अलीकडे परळी येथे माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांनी सर्व ब्राह्मण संघटनाच्या पदाधिकारी यांची ऐक्य परिषद घेतली.यास संपूर्ण राज्यातून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.या परिषदेत परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या स्थापनेला शासन दरबारी तोंड फुटले कारण बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कृषी मंत्री धनंजय मुंडे, भाजपाच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांनीही हा विषय मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्राधान्याने मंत्री मंडळ बैठकीत घेण्या विषयी विनंती केली.त्या नंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री.बाजीराव धर्माधिकारी, ॲड.अजिंक्य पांडव, श्री.शैलेश कुलकर्णी,श्री.मनोजजी जोशी यांच्या सह राज्यभरातील शिष्टमंडळास व्यापक चर्चेसाठी दिनांक ३ सप्टेंबर २०२४ रोजी सहयाद्री



अतिथीगृह मुंबई येथे निमंत्रित करून परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या प्रारूप संबंधी चर्चा करून लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत महामंडळ स्थापनेची घोषणा केली जाईल असे वचन दिले आणि पंधरा दिवसाच्या आत दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत बहुप्रतीक्षित आणि ब्राह्मण समाजाच्या आर्थिक उन्नती साठी मोलाची भूमिका ठरू शकणाऱ्या परशुराम आर्थिक विकास महामंडळाची अधिकृत घोषणा केली आणि सुरवातीला ५० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद ही जाहीर केली आणि समस्त ब्राह्मण समाजाला दिलेला शब्द लोकनेते देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण केला.ज्याचे राज्यातील ब्राह्मण समाजाने जल्लोषात स्वागत केले या विषयात खारीचा का वाटा होत नाही उचलण्यास माझ्या सारख्या समाजात कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यास संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो.मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्या शी झालेल्या बैठकीतील चर्चेत ब्राह्मण समाजाच्या आर्थिक हिताच्या संबंधीचा निर्णय दीर्घकाळ प्रलंबित आहे हे मान्य करून तो सोडवण्याच्या दृष्टीने मी स्वतः प्रयत्नशिल असल्याचे सांगितले होते.त्यांनी त्यांचा हा शब्द पळून ब्राह्मण समाजातील तरुणांच्या प्रगतीचा मार्ग खुला केला आहे.याची ब्राह्मण समाज सातत्याने जाणीव ठेवेल हे या पत्रकाच्या माध्यमातून सांगू इच्छितो असे ही युवा नेते ॲड.अजिंक्य पांडव यांनी म्हंटले आहे. लवकरच उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि ज्यांनी ज्यांनी हा विषय मार्गी लावण्यासाठी मोलाची भूमिका बजावली अश्या मान्यवरांच्या सत्काराचे आयोजन करून कृतज्ञता व्यक्त करणार असल्याचे घोषित केले आहे.हा संघर्ष उभारताना आमच्या सोबत बीड मधील प्रा.प्रेरक वैद्य, प्रा.अभय पटवारी,श्री.संतोष चिंचोलकर,डॉ.गणेश आडगांवकर, प्रा.श्रीकांत कुलकर्णी, श्री.संतोष भणगे,प्रा. एस.एन.कुलकर्णी सर, श्री.हेमंत महाराज गोंदिकर, श्री.हर्षद आडगांवकर, ॲड.अमित हसेगांवकर,श्री.संजय देवा कुक्कडगांवकर, डॉ.सुहास देशपांडे,प्रा.उमेश बोबडे, प्रा.मिलिंद शिवणीकर, श्री.नंदु रोहे, श्री.शुभम (विक्की) जोशी, श्री.अनिल जोशी, श्री.महेश महाराज कुलकर्णी, श्री.अजिंक्य मुळे, श्री.विनायक जोशी सर, श्री.गणेश जोशी, डॉ.अजय कुलकर्णी,डॉ.प्रसाद वाघिरकर, डॉ.प्रवीण रत्नपारखी, डॉ.विनोद मुळे, श्री.राहुल महाराज देशपांडे, श्री.विकास मानुरकर, श्री.हेमंत जोशी,अभिजित महाराज निर्मळ,श्री.अनिकेत जोशी, प्रा.गोविंद शिवनिकर,श्री.त्रिंबक देशपांडे काका,श्री शरद कुलकर्णी, श्री.विशाल जोशी, श्री.संजय मामा खंदाट, श्री.सतीश देशपांडे काका श्री.चैतन्य काका,श्री.प्रदीप कुक्कडगावकर,श्री संतोष कुलकर्णी,श्री.सचिन खडके, श्री.गणेश देशमुख,श्री.प्रतीक सांगडेयांनी सतत संघर्ष केला.



आष्टी तालुक्यातील सावरगाव येथील भिल्ल समाजातील कैलास पवार यांच्या झोपडीला मेणबत्तीने आग लागल्याने त्यांचे पूर्ण ग्रह उपयोगी वस्तू जळून भस्मासा झाले आहेत त्यामुळे हे कुटुंब आता उघड्यावर पडले आहे त्याचे हे घेतलेले छायाचित्र छायाचित्र सुरेश कांबळे

# रसिक मंडळाने आयोजिला पं . पलुस्कर स्म्रती संगीत समारोह

## सुरेल मैफल व सुगम नाट्यगीत स्पर्धेने मिळणार माजलगावकरांना संगीत मेजवानी

माजलगाव (प्रतिनिधी)

माजलगाव चा नामांकित सांस्क्रतिक चेहरा म्हणुन ओळख असलेले रसिक मंडळ अभिजात संगीताची अभिरूची वाढवत आहे. दोन दिवसीय संगीत महोत्सवात विविधांगी कार्यक्रम म. ज्यो फुले विद्यालयातल्या अनंत भालेराव सभाग्रहात होणार आहेत. शनिवारी भारत रत्न लता मंगेशकर जयंती दिनी सायं. ६.३० वाजता या महोत्सवाचे उद्घाटन पं. राम बोरगावकर ( लातुर) यांच्या हस्ते होईल . बोरगावकर यांचे तबला सोलो वादन ही होईल. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड भिलेगावकर आर. डी. असतील. गायक श्री लक्ष्मिप्रसाद पटवारी आणि छोटे उस्ताद फेम कु .सायली टाक ( लातुर) या दोन टि.व्ही . स्टार ची सुरेल मैफल होईल. २९ सप्टे. रविवार रोजी सकाळी ९.३० वाजता श्री भागवत पाठक यांच्या बासरी वादनाने कार्यक्रमाची सुरूवात होईल. कुणाल लवुळकर आणि चैतन्य अहेर यांच्या मार्गदर्शनातील नांदी सादर होईल. श्री भगवान( बप्पा ) देशमुख यांच्या शुभहस्ते स्पर्धा प्रारंभ करनारा भाग्यवान निवडुन दोन गटातील मराठवाडा स्तरीय सुगम नाट्यगीत गायन स्पर्धेला सुरूवात होईल. स्पर्धेचे हे २१ वे वर्ष आहे. या वर्षी दोन्ही गटात मिळुन साठ हुन अधिक स्पर्धकांची नोंदणी झाली आहे. समारोप प्रसंगी लातुर चा संमिहन जोशी यास सौ. स्मिता लिमगावकर प्रायेजित तबला नवाज स्व. शंकरराव पांडे पुरस्काराचे वितरण होईल. आणि स्पर्धेचे पारितोंषिक वितरण होईल. या कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील मंगलनाथ मल्टिस्टैट चे सिईओ आणि रोटरी क्लब ाफ माजलगाव सिटीचे अध्यक्ष मा. रविंद्र कानडे तर व्यापारी महा संघाचे व श्री सिद्धेश्वर संकुलाचे स्थानिक अध्यक्ष श्री सुरेंद्र रेदासणी हे प्रमुख पाहुणे असतील. भरघोस नगदी

पारितोषिकाचे प्रायोजक श्री मधुकर वैद्य , प्रा. स्नेहल पाठक , सतिश नरवाडकर , प्रदिप भिलेगावकर , राजेश देशपांडे , निरंजन वाघमारे , माधुरी बाभुळगावकर , योगिंद्र चौकिदार , , प्रशांत भानप , बी. एस. देशपांडे , सुरेश भानप हे आहेत. स्पर्धा यशस्विते साठी ड. रत्नाकर चौकिदार , दिगंबर महाजन , रंगनाथ सावंत , बालाप्रसाद चव्हाण , राम देशपांडे , सुरेश भानप , डॉ. नरेंद्र निळेकर , पोरे गुरूजी , सखाराम जोशी , खोडसकर प्रकाशराव , पंढरीनाथ जोशी , धनंजय जाडे मिनाक्षी निळेकर , प्रा. स्नेहल पाठक , तुषार देशमुख , अनिकेत भिलेगावकर , संजय कुलकर्णी , राजाभाऊ शेळके यांच्या सह सर्व सभासद परिश्रम घेत आहेत. दोन्ही दिवस या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे अवाहन प्रभाकर साळेगावकर , सुरेश भानप , ड. भिलेगावकर यांनी रसिक मंडळाच्या वतीने केले आहे.

# स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय, बीड

या महाविद्यालयाच्या सल्लागार समितीमध्ये माजी ज्येष्ठ नगरसेवक विष्णू वाघमारे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय बीड महाविद्यालयाच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासात्मक दृष्टिकोन तयार करण्यासाठी , सल्ला देण्यासाठी आणि मदत करण्यासाठी म्हणून स्थानिक समाजासह विविध क्षेत्रातील नामनिर्देशित व्यक्तीची निवड केली जाते. या अनुषंगाने माजी आमदार माननीय राजेंद्रजी जगताप साहेब यांनी माजी ज्येष्ठ नगरसेवक विष्णू (भैय्या) शामराव वाघमारे यांची नियुक्ती केली. माजी आमदार मा.राजेंद्रजी जगताप साहेब यांनी जो दिलेला मान सन्मान त्याबद्दल माजी ज्येष्ठ नगरसेवक विष्णू (भैय्या )शामराव वाघमारे यांनी जगताप साहेबांच्या निवासस्थानी जाऊन या निवड केल्याबद्दल सत्कार त्यांचा केला. व मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे मा.अध्यक्ष, सचिव व पदाधिकाऱ्यांचे मनापासून आभार मानले. या निवडीबद्दल रिपाईचे बीड जिल्हा सचिव तथा माजी नगरसेवक राजू जोगदंड, माजी नगरसेवक युवराज जगताप , मनोज नाना मस्के यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच सामाजिक, राजकीय, विविध क्षेत्रातील मान्यवर त्यांचे अभिनंदन करत आहेत.



# जागोजागी उखाडलेल्या बीड–नगर राज्य महामार्गावरील खड्ड्यात झाडे लावून गांधीगिरी!

## महामार्गावरील खड्डे तात्काळ बुजविण्याची गाढवे याची मागणी

आष्टी ।सुरेश कांबळे

गेल्या अनेक महिन्यांपासून कायम रहदारीचा असलेला बीड नगर राज्य महामार्गावर जागोजागी मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याने वाहन धारकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.त्याच बरोबर खड्डे चुकविण्याच्या नादात अपघाताच्या घटनेत देखील वाढ झाली असल्याने या रस्त्यावरील खड्ड्यात झाडे लावून गांधीगिरी करत खड्डे बुजविण्याची मागणी विजय गाढवे यांनी केली आहे.

बीड नगर राज्य महामार्ग हा डोंगरकिन्ही दौलावडगांव येथून जात आहे.गेल्या अनेक महिन्यांपासून या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले असताना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याने दररोज खड्डे चुकविण्याच्या नादात होत असलेले अपघात लक्षात घेता.त्वरीत खड्डे बुजविण्यात यावेत यासाठी धामणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते विजय गाढवे यांनी धामणगाव येथे राज्य महामार्गावरील धामणगाव येथे रस्त्याच्या मधोमध पडलेल्या खड्ड्यात झाडे लावून गांधीगिरी केली.यावेळी तरूण मोठ्या संखवेने उपस्थित होते.

किती माणसाचा जीव गेल्यावर या रस्त्यावरील खड्डे बुजणार

या रस्त्याचे अनेक वेळा खड्डे बुजवण्याचे काम झाले परंतु ज्या ठेकेदाराला हे खड्डे बुजवण्याची काम दिली जाते ते प्रत्येक वेळी तो ठेकेदार थातूरमातूर खड्डे बुजून मोकळा होतो बिल काढतो त्यात अधिकारी व ठेकेदार यांचे संगणमत असल्याने कितीही तक्रारी झाल्या तरी काहीच होत नाही त्यामुळे या ठेकेदार व अधिकारी यांच्यावर योग्य ती कारवाई व्हावी कारण या रस्त्यावर या खड्ड्यामुळे अनेक अपघात होऊन अनेक जण जखमी झाले आहेत तर अनेक जणांना आपला प्राण गमावू लागला आहे तर याची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी घेऊन त्वरित या रस्त्यावरील खड्डे बुजवावीत अशी मागणी आता ग्रामस्थांकडून होऊ लागली आहे

# आष्टी तहसीलमध्येअधिकाऱ्यांसमवेत समाजसेवक सुरेश पाटलांनी घेतली बैठक

आष्टी /प्रतिनिधी

पाटोदा विभागीय प्रांत अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी प्रमोद कुदळे सह महसूल विभागाची समाजसेवक सुरेश पाटील यांनी तहसील कार्यालय आष्टी येथे बैठक घेवून तालुक्यातून जाणारा सुरत–चैनई महामार्गाच्या जमीन अधिग्रहणासंदर्भात योग्य सूचना व आदेश शिव संघर्ष ग्रुप महाराष्ट्र राज्याचे पदाधिकारी तथा समाजसेवक सुरेश पाटील यांनी दिल्या.



आष्टी तालुक्यातून जाणारा सुरत–चेन्नई महामार्ग याचे जमीन अधिग्रहणाचे काम सद्या चालू असून, अधिग्रहणात कोणत्याही कमतरता राहणार नाहीत. कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही. योग्य ते पंचनामे करून तसा अहवाल राष्ट्रीय महामार्ग विभागाला पाठवण्याच्या सूचना शिव संघर्ष ग्रुप महाराष्ट्र राज्याचे पदाधिकारी तथा समाजसेवक सुरेश पाटील यांनी महसूल विभागाला दिल्या आहे. महामार्गाचे जमीन अधिग्रणाचे काम सध्या सुरू झालेले आहे. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या महामार्गात जाणार आहेत त्या शेतकऱ्यांचे घर ,झाडे ,जमीन, पत्र्याचे शेड,कांदा चाळ,गायगोठे, विहीर, फळझाडे, दगडीच्या पवळी, इत्यादीं सर्व योग्य ती माहिती घेऊन सर्व शेतकऱ्यांना जमीन अधिग्रहणाचा मोबदला मिळण्याच्या दृष्टिकोनातून योग्य ते अहवाल शासनाला पाठवावा. अशा सुचना प्रांत अधिकारी प्रमोद कुदळे सह महसुल कर्मचारी यांना सुरेश पाटील यांनी बैठकतून दिल्या.

# लोकशाही पत्रकार संघाच्या माजलगाव तालुका सचिवपदी समाधान गायकवाड यांची निवड

माजलगाव (प्रतिनिधी)

दि.२४ सप्टेंबर रोजी लोकशाही पत्रकार संघाच्या जिल्हा कार्यालयामध्ये लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापकीय अध्यक्ष भागवतजी वैद्य व ग्रामपंचायत सरपंच विकास समितीचे प्रदेश उपाध्यक्ष सखाराम पोहिकर यांच्या उपस्थितीमध्ये माजलगाव तालुक्यातील नाकलगाव येथे लोकोपयोगी विविध सामाजिक उपक्रम राबवणारे दैनिक युवतीराजचे तालुका प्रतिनिधी समाधान गायकवाड यांची लोकशाही पत्रकार संघाच्या माजलगाव तालुका सचिवपदी निवड करण्यात आली व त्यांना माजलगाव तालुका सचिव पदी निवड झाल्याबदल नियुक्ती पत्र देताना लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापकीय अध्यक्ष भागवतजी वैद्य व ग्रामपंचायत संरपंच विकास समितीचे प्रदेश उपाध्यक्ष व दैनिक विदर्भ सत्यजित व साय दैनिक साई संध्याचे बीड जिल्हा प्रतिनिधी सखाराम पोहिकर यांच्या उपस्थितीमध्ये हे नियुक्ती पत्र देण्यात आले व पुढील कार्यास हार्दीक शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी नियुक्ती पत्र घेताना समाधान गायकवाड म्हणाले की लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापकीय अध्यक्ष भागवतजी वैद्य व ग्रामपंचायत सरपंच विकास रुमितीचे प्रदेश उपाध्याक्ष सखाराम पोहिकर यांनी माझ्यावर माजलगाव तालुक्याच्या सचिव पदाची जबाबदारी दिली आहे त्या पदाचा मी वापर जनसामान्य माणसाच्या समस्या शासनदरबारी मांडुन सोडवण्यासाठी तसेच समाजातील सर्व दुबळ्या गोर गरीबाना न्याय देण्यासाठी मी सदैव तत्पर सेवा देण्याच काम करु लोकशाही पत्रकार संघाच जाळ संपूर्ण माजलगाव तालुक्यात खेडोपाडी जाऊन लोकशाही पत्रकार संघाच्या काम काय आहे याची माहिती देण्यात येईल तसेच पत्रकारांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी येणाऱ्या पुढील काळात लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने मार्गी लावण्यासाठी आपणं सतत प्रयत्नशील राहु असे नियुक्ती पत्र घेताना आपले मत व्यक्त केले.




# मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यतीत बकासुर, सर्जा, सोन्या, हिंदकेसरी नामांकित बैलजोड्यांचा थरार बीडकरांना पाहायला मिळणार...!

## राजेंद्र मस्के मित्र मंडळाचे उत्कृष्ट नियोजन ..!

बीड (प्रतिनिधी)

आता पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर बीड मध्ये सुद्धा भव्य मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यतीचे आयोजन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष, शेतकरी मित्र राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने बीड शहरा जवळील तळेगाव शिवारात२९ सप्टेंबर रविवार रोजी सकाळी ०९.०० वा मैदान सुरु होणार आहे. बहुचर्चित मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यतीमध्ये महाराष्ट्रातील नामांकित बैल बकासुर, सर्जा, सोन्या, हिंदकेसरी यासारख्या धडाकेबाज बैलजोड्या शर्यतीत सहभागी होणार आहेत.हौशी शेतकरी बांधवांना पश्चिम महाराष्ट्रा प्रमाणे आपल्या जिह्यात बैलगाडा शर्यतीत सहभाग घेता यावा यासाठी राजेंद्र मस्के मित्र मंडळ यांनी गतवर्षी प्रमाणे याहीवर्षी बैलगाडा



शर्यतीचे आयोजन केले असून, बैलगाडा शर्यतीचे हे तिसरे वर्ष आहे. मागील वर्षी घोषित केल्याप्रमाणे प्रथम बक्षीस सोनालीका ट्रॅक्टर ठेवण्यात आले असून, इतर सहा रोख आकर्षित बक्षिसे विजयी स्पर्धकांना देण्यात येतील. बीडसह महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातून शेतकरी तथा स्पर्धक संपर्क साधत असून, हजारोच्या वर शेतकरी स्पर्धेत सहभागी होतील असा अंदाज आहे.शर्यतीचे उत्कृष्ट नियोजन करण्यात येत असून, पार्किंग व्यवस्था, पिण्याचे पाणी आदीसह प्रेक्षकांच्या सुरक्षेसाठी बॅरेकेट बसवण्यात आले आहेत. तरी जिल्ह्यातील हौशी शेतकरी बांधवानी बैलगाडीचा थरार पाहण्यासाठी बहु संखेने उपस्थीत राहावे असे आवाहान राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.ऑनलाई नाव नोंदणीकरिता संपर्क – अविनाश नवले– ९९२११११४९५४, ९१३०८८७८८८, अजय सावंत – ९३५९००५८७९

# गिरीराज पतसंस्था सभासदाचे व संस्थेचे हित जोपासत प्रगती करत राहणार चेअरमन अनिल चिद्रवार

किल्लेधारूर / रोहित फावडे

गिरीराज नागरी सहकारी पतसंस्था शहरात व्यापारपेठेत सभासद व्यापा–याऩा प्रगती करता आर्थीक पाठबळ देण्याचे काम करते सभासद व संस्थेचे हित जोपासत संस्था प्रगती करत राहील असे प्रतीपादन ३३ व्या वार्षीक सर्वसाधारण सभेत बोलताना चेअरमन अनिल चिद्रवार यांनी व्यक्त केले. धारूर व परीसरात गेल्या ३४ वर्षा पासून सहकार क्षेत्रात यशस्वी पणे चालणारी सस्थापक अध्यक्ष सुंमतराव डुबे यांचे मार्गदर्शना खाली यशस्वी पणे कारभार सुरू असलेली गिरीराज नागरी सहकारी पतसंस्थेची ३३ वी सर्वसाधारण सभा पतसस्थेच्या सभागृहात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्ष स्थानी जेष्ठ सभासद पुरूषोत्तम कंकाळ हेतर व्यासपीठावर चेअरमन अनिल चिद्रवार व्हाईस चेअरमन रामेश्वरआप्पा गुळवे हे




उपस्थीत होते. यावेळीप्रथम सस्थेचा कार्याबद्दल चेअरमन अनिल चिद्रवार याऩी संस्थेचा प्रगतीचा अहवाल सभासदा समोर मांडला संस्था पाच लाखा पेक्षा जास्त नफा झाल्याचे सांगत संस्थेचे संस्थापक मार्गदर्शक सुमंतराव डुबे याऩी सभासद शहरातील व्यापारी याऩा आर्थीक पाठबळ मिळण्या साठी व प्रगती साधण्या साठी हि संस्था चालवली हे ध्येय समोर ठेवत हे संचालक मंडळ काम करत असुन सस्थेच्या आर्थीक प्रगती करता संस्थेचे कर्ज घ्यावे व वेळेत परत करावे संस्थेचे हित जोपासावे येणारे काळात विवीध उपक्रमसंस्था राबवणार असल्याचे साग़ीतले. यावेळी बोलताना जेष्ठ सभासद अनिल महाजन यांनी सस्थेच्या प्रगतीचे कौतूक करत पश्चीम महाराष्ट्रातील पतसंस्थाचा आदर्श घेऊन गिरीराज पतसंस्थेचे संचालक मंडळ काम करत आहे त्यांचे कार्यचे कौतूक केले. सभासदानी संस्थेच्या प्रगती करता वेळेत कर्ज परतफेड करून सहकार्य करण्याचे अवाहण केले.यावेळी सस्थेच्या सचिव सरीता वेदपाठक याऩी सभासदा समोर अहवाल वाचन केले याला मंजूरी ची सभासदाना विनंती केली सभासदानी एकमताने यांला मंजूरी दिली.यावेळी सच़ालक अनंत काळे, परमानंद तोष्णीवाल सभासद दिपक गुळवे अनिल कंकाळ याऩी काही सुचना केल्या त्याचेज़पालन करण्याचे अश्वासन देण्यात आले. अभार सचिव सरिता वेदपाठक याऩी मानले या सर्वसाधारण सभेला सर्व संचालक व सभासद मोठ्या संख्येने उपस्थीत होते

# विवाहा पुर्वी मुला मुली साठी एच आय व्हि तपासणी करणे आसरडोह ग्रामपंचायतने केले बंधनकारक

### ऐतीहासीक ठराव घेणारी पहीले गाव

किल्लेधारूर / प्रतिनिधी

तालूक्यातील आसरडोह ग्रामपंचायत सरपंच श्रीमती मंगल आबासाहेब देशमूख याच़े नेतृत्वा खाली उत्कृष्ट व आदर्श काम करत आहे. समाजातील ज्वलंत प्रश्न एच आय व्हि विषयी समाजात जनजागृती झाली पाहीजे भिती व गैरसमज दुर झाला पाहीजे या साठी विवाहा पूर्वी मुला मुलीना एच आय व्हि तपासणीचा ऐतीहासीक ठराव घेतला असुन राज्यात असा ठराव घएणारी



पहीली ग्रामपंचाय़त ठरली असून या ग्रामपंचायत चे सर्वत्र कौतूक होत आहे.

तालूक्यातील आसरडोह ग्रामपंचायत ने गेल्या एक वर्षात उत्कृष्ट कार्य केले असून आदर्श ग्रामपंचायत ठरत आहे ग्रामपंचायत च्या वतीने व आसरडोह गावच्या सरपंच श्रीमती मंगल आबासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एच आय व्ही संदर्भात जनजागृती म्हणून ऐतिहासिक ठराव घेण्यात आला ज्यामध्ये ग्रामपंचायत क्षेत्रात होणारे लग्नपूर्वी एच आय व्ही तपासणी करणे अनिवार्य करण्यात आली आहे ह्या ठरावामुळे खरंच एचआयव्ही संदर्भात जनजागृती करिता मोठा लाभ भेटणार आहे तसेच जवळपासचे ग्राम पंचायतला पण असा ऐतिहासिक निर्णय घेण्याकरिता प्रेरणा भेटणार आहे .सदरील ठराव राजेसाहेब आबासाहेब देशमुख यांनी सुचवला. ठरावास अनुमोदन वैजनाथ एकनाथ तरकसे यांनी दिले.ठरावास सर्व उपस्थित लोकांनी हात वर करून मान्यता दिली.ग्रामसभेस ग्रामसेवक मनोज डांगे,तालुका आरोग्य विभाग प्रतिनिधी डॉ.सय्यद नजीर,अंगणवाडी मदतनीस सुनिता तरकसे, आशा सेविका नरोटे,संस्था प्रतिनिधी नितीन घनघाव ,आरोग्य परिचारिका चौधरी व कर्मचारी ,गावकरी उपस्थित होते

# आपसातील कलगीतुरा बंद करा ४० वर्षांच्या विकासाचा अहवाल जनतेपुढे मांडा –नितीन जायभाये

बीड (प्रतिनिधी)

एकीकडे बीड शहरातील जनतेवर संकटांचे डोंगर कोसळत असताना. या सत्ताधाऱ्यांना कलगीतुरा खेळण्याचे नाटक सुचतेच कसे? पावसाचे आणि गटारांचे पाणी बिडकरांच्या घरात आणि दुकानांमध्ये घुसवून* बीडच्या जनतेला जिवंतपणे नरकात पाठवणाऱ्या या नितीभ्रष्ट झालेल्या महाभ्रष्ट नरकासुरांना गेल्या ४० वर्षात बीडचा काय विकास केला याचा हिशोब जनतेपुढे मांडवाच लागेल. या बीड शहरात बाजारपेठेंच्या मुख्य रस्त्यावर कुठेही अद्यावत महिला स्वच्छतागृहे हे महाभृष्ट सत्ताधारी आजपर्यंत बांधू शकले नाहीत हाच काय यांचा विकास ? बीड




शहरातील आया– बहिणींच्या मायमाऊलींच्या बद्दल असलेली तळमळ ?

हेच का यांचे पर्व ? कधी यांनी बीडमध्ये उद्योग व्यवसाय वाढण्यासाठी व औद्योगिक क्षेत्र आणण्यासाठी प्रयत्न केले ? कायम फक्त आपलीच घरं भरली. बीड करांना इतर शहरांमध्ये गेल्यानंतर तेथील नगरपालिका मूलभूत सोयी सुविधा किती चांगल्या पद्धतीने पुरवितात हे पाहून अक्षरशः लाज वाटते शरमेने मान खाली जाते. तिथे भेटलेली लोकं म्हणतात अहो तुम्ही बीडचे का आजही खूपच मागासलेला असलेला भाग आहे तुमचा... तेव्हा खरंच आपल्या सर्व विकास पुरुषांबद्दल फार अभिमान वाटतो... कधी थांबणार हे सगळं..? कलगीतुरे थांबवा आणि विकासाचा अहवाल जनतेपुढे सादर करा ही मी जिम्मेदारी पूर्वक बीड शहरातील जनतेच्या वतीने व बीड शहर बचाव मंचाच्या वतीने मागणी करत आहे.



युवासेना कार्यकारिणी सदस्य विपुल पिंगळे यांची संपूर्ण मराठवाडा निरीक्षक पदी निवड

बीड : हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते तथा मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या आदेशानुसार खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेशजी सरनाईक यांच्या विनंतीनुसार विपुल पिंगळे पाटील यांची शिवसेना पक्षाच्या युवासेना संपुर्ण मराठवाडा विभाग पदी नियुक्ती करण्यात आली

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण आत्मसात करुन शिवनसेना पक्ष वाढीसाठी आपण प्रयत्नशील असणार असल्याचे राज्य कार्यकारिणी सदस्य तथा संपुर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे पाटील यांनी म्हटले आहे.बीड शहरातून एका सामान्य कार्यकर्त्याची दखल घेत काही दिवसांपूर्वीच विपुल पिंगळे यांच्या वर पक्षाने युवासेना कार्यकारिणी सदस्य पदाची जबाबदारी दिली होती ती चोकपणे पार पाडत असताना आज त्यांच्यावर संपुर्ण मराठवाडा विभागाची जबाबदारी देण्यात आली तसेच शिवसेनेच्या सर्व पदाधिकार्यांचे व शिवसेना मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व खासदार डॅा श्रीकांतजी शिंदे तसेच युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेशजी सरनाईक यांचे विपुल पिंगळे पाटील यांनी आभार मानले

# सेवानिवृत्त शिक्षक कवि मधूकर बरके यांचे मनोबल काव्यसंग्रहाचे उत्साहात प्रकाशन

## परिसराचा खोलात जाऊन इतिहास सांगणारा काव्यसंग्रह

साहित्यिक प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे

किल्लेधारूर (प्रतिनिधी)

धारूर शहर हे ऐतीहासीक शहर आहे काही खुणा शहराचे इतिहासाची ओळख करून देतात या पुढची शहराची ओळख शहरातील जेष्ठ कवी मधुकर बरके यांचा काव्यसंग्रह मनोबल करून देत असून खोलात जाऊन शहराची ओळख करून देतोय असे प्रतिपादन गझलकार, साहित्यीक व कवी प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे यांनी मनोबल या काव्यसंग्रहाचे प्रकाशन प्रसंगी बोलताना केले. धारूर येथील सेवानिवृत्त शिक्षक कवी मधूकर बरके यांनी लिहलेला मनोबल हा काव्यसंग्रह चा प्रकाशन सोहळा राजमाता जिजाऊ महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजीत करण्यात आला होता. या प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्षस्थानी प्राचार्य

डॉ. गोपाळ काकडे हे होते तर प्रकाशन साहित्यिक कवी प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी कवियत्री सिमाताई गुंड़, उपप्राचार्य एम एन गायकवाड, एस टि आगाराचे आगारप्रमुख नवनाथ चौरे, पत्रकार अनिल महाजन,ड.



कुंदन शुक्ला, कवी मधूकर बरके हे उपस्थीत होते. यावेळी प्रथम काव्यसग्रहाचे प्रकाशन प्रा. मुकुंद राजपंखे व उपस्थीत मान्यवराचे हस्ते करण्यात आले. वयाचे ८४ व्या वर्षी काव्यसग्रह प्रकाशित करणारे सेवानिवृत्त शिक्षक व कवी मधूकरराव बरके यांचा सत्कार करण्यात आला. त्याऩा सहकार्य करणारे त्याच़े मुलाचा हि सत्कार करुन कौतूक करण्यात आले. प्रकाशन प्रसंगी बोलताना प्रा. मुकुंद राजपंखे यानी मार्गदर्शन करताना मुलांनी वडीलांचा काव्यस्रह प्रकाशीत करण यांच कौतूक केले. या मनोबल काव्यसंग्राहात शहराचा इतिहासाबरोबर शहर जडणघडणीत महत्वाचे व्यक्तीची माहिती कविता रुपात आहे. पुस्तक प्रकाशित करताना निर्मिती साठी जे कष्ट लागतात हे माहीत असणे गरजेच नशिबीला स्वत:चे जिद्दीन जिंकलं चांगल्याला चाग़ल म्हणणं याच़ी शिकवण मनोबल हा काव्यसंग्रह देतो असे प्रा. राजपंखे यांनी सांगीतले. यावेळी बोलताना कवियत्री सिमाताई गुंड यांनी चांगल करण्याची जिद्द असावी लागते जिद्द कशी पुर्ण करावी हे या वयात जिद्दीने काव्यसंग्रह प्रकाशित करणारे मधूकरराव बरके कडून शिकले पाहीजे असे सांगीतले. यावेळी पत्रकार अनिल महाजन याऩी आपले विचार व्यक्त केले. कवि मधूकर बरके याऩी आपण अनेक चळवळीत काम केले चांगल्या घटना व्यक्तीवर कविता करणे हा माझा छंद होता काव्यसंग्रह प्रकाशित करताना अनेक अडचणी आल्या पण जिद्दीने आपण ते केले लवकर आणखी एक काव्यसग्रह प्रकाशित करण्याचा मनोदय व्यक्त केला. अध्यक्षीय समारोप प्राचार्य गोपाळ काकडे यांनी केला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन प्रा राम लोखंडे यांनी केले.

# नाली साफ सफाई करून मुरूम टाकून पत दिवे लावण्यात यावेत पँथर जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे

बीड (प्रतिनिधी)

शहरातील काझी नगर बालेपिर या ठिकाणी भरपूर लोकसंख्या आहे तरी त्या ठिकाणी आज पर्यंत रस्ता बनवण्यात आला नाही. नाल्या साप केल्या जात नाहीत व त्या ठिकाणी पथदिवे सुद्धा लावले जात नाहीत. गेल्या अनेक वर्षांपासून ज्यांची सत्ता आहे त्यांनी काय दिवे लावलेत हे यामधून निदर्शनास येत आहे सत्ता परिवर्तन होणे काळाची गरज आहे तोपर्यंत सर्वसामान्यांचे अडी अडचणी व जनसामान्यांचे प्रश्न सुटणार नाहीत.काझी नगर बालेपिर या ठिकाणी पावसामुळे रस्त्यावर पूर्णपणे चिखल झालेला आहे व नाली साफ न केल्यामुळे नाली मधील सर्व घाण व पाणी हे रस्त्यावर येत आहे त्यामुळे तेथील नागरिकांना रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून त्या ठिकाणी रोडवर मुरूम टाकने व नाली साफ करणे पथदिवे लावावेत नगरपरिषद यांना ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने निवेदन देऊन विनंती करण्यात



आली आहे चार दिवसाच्या आत त्यांनी आमची मागणी मान्य जर नाही केली तर तेथील घाण नगर परिषद सिओ यांच्या केबिनमध्ये टाकून ऑल इंडिया पँथर सेना बीड जिल्ह्याच्या वतीने आंदोलन केले जाईल याची प्रशासनाने दखल घ्यावी.

# तरनळी काळूचिवाडी येथे ऊसतोड मजुरांसाठी आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

किल्लेधारूर (प्रतिनिधी)

केज युवा ग्राम विकास मंडळ हे गेल्या अनेक वर्षांपासून समाजात विविध प्रश्नावर काम करत आहे ऊसतोड कामगार यांचे सुरक्षित स्थलांतरण व्हावे याकरिता स्थलांतरित ऊसतोड कामगार मजुरांसाठी जनरल आरोग्य तपासणी शिबिर काळूचिवाडी तरनळी येथे संपन्न झाले.

या आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन प्रसंगी सरपंच महादेव खेडकर , आशा सेवीका ज्योती सरवदे , सिस्टर माने बी बी, ए एन एम हजारे, आंधळे आर एम, भाग्यश्री वाघमारे, प्रकल्प व्यवस्थापक संतोष रेपे, प्रकाश काळे यांची उपस्थिती होती.या आरोग्य तपासणी शिबिरात बीपी, सुगर, एच बी, बी एम आय, सर्दी ताप खोकला, डोके दुखी आशा विविध आजारांची तपासणी करण्यात आली. तर मोठ्या आजारासाठी केज येथील सिव्हील हॉस्पिटलकडे रुग्णांना रेफर करण्यात आले.गावातील सर्व ऊसतोड मजुरांची साखर कारखान्याला जाण्याची घाई आहे. हे मजूर सहा महिन्यांसाठी ऊसतोडणीला जातात ते स्थलांतर होण्याच्या ज अगोदर त्यांची आरोग्य तपासणी




होणे गरजेचे आहे. यामुळें युवा ग्राम विकास मंडळ संचलित स्वच्छ पिण्याचे पाणी प्रकल्प अंतर्गत या आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य तपासणी शिबिरात एकूण ५६ व्यक्तींची तपासणी करण्यात आली. हे आरोग्य तपासणी शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रकल्प समन्वयक संतोष रेपे, प्रकाश काळे, सुनिता विभूते व गावातील पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

# भक्ती कंट्रक्शन येथील होम मिनिस्टर कार्यक्रमाने महिलांच्या उस्फुर्ततेने आजपर्यंतचा गर्दीचा उच्चांक मोडला

बीड (प्रतिनिधी)

गेल्या नऊ दिवसापासून सुरू असलेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा या कार्यक्रमाची लोकप्रियता महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात झाली आहे. मीच पैठणी जिंकणार या आत्मविश्वासाने महिला या कार्यक्रमात हिरीरीने सहभागी होत आहेत.भक्ती कन्ट्रक्शन विश्वेश्वर मंदिर प्रभाग क्रमांक ११ या कार्यक्रमात महिलांच्या सहभागाचा उच्चांक निर्माण झाला.

काकू- नाना प्रतिष्ठान आयोजित माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या कार्यक्रमाची लोकप्रियता शिगेला पोहोचली आहे. हजारोच्या संख्येने महिला या कार्यक्रमात सहभागी होत आहेत. या कार्यक्रमाचे उद्धाटन सौ. मंगल प्रभाकर कवठेकर सौ. सुवर्णा राजेश पिंगळे, सौ. रेणुका मुकुंद भालेकर,महिला आघाडीच्या अध्यक्ष सौ. जयश्रीताई विधाते, माजी सभापती सौ. उषाताई सरवदे, सौ.प्रेम लता ताई चांदणे, सौ.किर्तीताई पांगारकर साळुंके, सौ. भारतीताई राजेश क्षीरसागर सौ. अंजलीताई पांगारकर,सौ. पूजा अमित चव्हाण काशीबाई सुधाकर उनवणे, सौ. रेणुका प्रकाश ढाकणे,सौ. कविता गणेशराव देशमुख,सौ. शांता जालिंदर पैठणे आदी मान्यवर महिलांची उपस्थितीत पारपडले. याप्रसंगी राजाभाऊ पिंगळे, गणेशजी देशमुख, सुधाकर उनवणे, गोपाळरावजी नाईक, संजय वाघमारे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थित होती. होम मिनिस्टर चंपावती




सम्राज्ञी खेळ पैठणीचा या कार्यक्रमाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे . १८ सप्टेंबर २०२४ ते ४ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत सुरू असलेल्या कार्यक्रमाने दिवसेंदिवस गर्दीचे उच्चांक मोडले आहेत .कालच्या कार्यक्रमापेक्षा उद्याचा कार्यक्रम अधिक भरभच्च आणि लोकप्रिय होत आहे. याचे सर्व श्रेय काकू- नाना प्रतिष्ठान आयोजित आणि जयदत्त अण्णा क्षीरसागर महिला आघाडी विचारमंच यांच्या सूत्रबद्ध नियोजनातून ही स्पर्धा दिवसेंदिवस लोकप्रियतेचे शिखर काबीज करीत आहे.

या कार्यक्रत भाग्यवान मानाच्या पैठणीची विजेती सौ. जनाबाई कैलास काळे, द्वितीय इमिटेशन ज्वेलरीच्या मानकरी विजेत्या सौ. रोहिणी निखिल सुपेकर . तर तृतीय विजेत्या चौरंगाच्या मानकरी सौ. प्रतिमा विजय मोरे या ठरल्या आहेत.तर उर्वरित सात महिलांना गिफ्ट हॅम्पर देण्यात आले.यामध्ये सौ. वैशाली सुहास पुरंदरे,सौ. प्रतिमा विश्वनाथ भवर ,सौ.मीना अभिमन्यू माने,सौ.मीनाक्षी राजेंद्र गाडेकर ,सौ.प्रणिता जीवन सूर्यवंशी,सौ. आश्विनी आनंद जोशी या मानकरी ठरल्या कार्यक्रमात बक्षिसाचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विजेत्या सर्व महिलांची ७ ऑक्टोबर रोजी बीएच.एम.एस. कॉलेज येथे होणाऱ्या खेळ पैठणीचा महाराष्ट्रातील प्रसिद्ध क्रांती नाना माळेगावकर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे .यासाठी सर्व महिलांची निवड झाली आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयदत्त अण्णा क्षीरसागर विचार मंचाचे सर्व नगरसेवक कार्यकर्ते यांनी हा कार्यक्रम यशस्वी केला. जवळपास साडेतीन तास महिलांना खेळवत कार्यक्रमात आनंदाचे नवरंग भरण्याचे काम महाराष्ट्रतील सुप्रसिद्ध निवेदक सुरेशभाऊजी अर्थात निवेदक सुरेश साळुंकेंनी केले .या कार्यक्रमास महिलांची बहुसंख्येने उपस्थिती होती.




बीड,गेवराई, शिरुर, पाटोदा,कडा, आष्टी, राष्ट्रीय चर्मकार महासंघाची तालुका व जिल्हा कार्यकारिणी निवड,झाली ,बीड,जिल्हा अध्यक्ष विलास बामनेराष्ट्रीय चर्मकार महासंघ संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप साहेब नाना यांच्या आदेशानुसार व प्रदेश अध्यक्ष माधवरावजी गायकवाड सहेब व प्रदेश महासचिव रोहीदास बनसोडे साहेब व ,प्रदेश उपाध्यक्ष रविन्द्र नाना बोराडे साहेब व मार्गदर्शक सत्यनारायणजी उनवणे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व तसेच ,सर्व मान्यवरांच्या उपस्थित सर्व,बीड जिल्हा व तालुका ,अध्यक्ष ,पदी व कार्यकारिणी निवड करण्यात आली बीड,गेवराई शिरुर,पाटोदा,कडा,आष्टी या तालुक्यातील सर्व समाज बांधव व,मान्यवरानी उपस्थित होते

# हजरत मुहम्मद पैगंबर यांच्या पवित्र जीवनावर आधारित अजीमुश्शान जलस - ए - आम चे आयोजन

## जमीअत उलमा - ए - हिंदचे मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड (प्रतिनिधी)

येथील जमीअत उलमा - ए - हिंद जि.बीड च्यावती हजरत मुहम्मद पैगंबर यांच्या पवित्र जीवनावर आधारित अजीमुश्शान जलस - ए - आम म्हणजे व्याख्यान कर्यक्रचे आयोजन शहरातील ऐतिहासिक जामा मस्जिद येथे दि. २९ सप्टेंबर २०२४ रविवार रोजी सकाळी १०:०० वाजता करण्यात आले आहे. असे की,हजरत मुहम्मद पैगंबर यांचा जीवन परिचय व त्यांच्या पवित्र जीवनातून आदर्श घेऊन समाजातील वाईट प्रवृत्तीचा नाश करून एक आदर्श समाज निर्माण करण्याच्या हेतूने येथील जमीअत उलमा - ए - हिंद जि.बीड च्यावती हजरत मुहम्मद पैगंबर यांच्या पवित्र जीवनावर आधारित अजीमुश्शान जलस - ए - आम म्हणजे व्याख्यांचे व इस्लाहे मुआशरा (समाज सुधार) कार्यक्रमचे आयोजन शहरातील ऐतिहासिक जामा मस्जिद येथे दि. २९ सप्टेंबर २०२४ रविवार रोजी सकाळी १०:०० वाजता करण्यात आले आहे.

सदरील कार्यक्रम हा हजरत मौलाना हाफेज नदीम सिद्दिकी यांच्या मार्गदर्शनाखाली तर हजरत मौलाना कारी शमसूल हक्क यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडणार असून सदरील कार्यक्रमात जगप्रसिद्ध दारुल उलूम देवबंद येथील प्रसिद्ध व्याख्याते हजरत मौलाना मो. इरफान कासमी सहाब हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित राहणार आहे.तरी वरील कार्यक्रमात जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जमीअत उलमा - ए - हिंद जि.बीड च्या वतीने मुजतबा अहमद खान (मराठवाडा उपाध्यक्ष),मुफ्ती अब्दुल्लाह कास्मी (बीड जिल्हाध्यक्ष), मौलाना साबेर रशिदी (जर्नल सेक्रेटरी), काजी मुजीबर्ररहेमान (सद्भावना मंच कन्व्हेनर), शेख पाशाभाई, काजी जफर,पठाण अमर जान सह आदींनी केले आहे.

# अनिलदादा जगताप यांच्या संकल्पनेतून बीडमध्ये ५ ऑक्टोबर रोजी होम मिनिस्टर स्पर्धेचे आयोजन

## फ्रिज, टीव्ही, शिलाई मशीनसह विजेत्या महिलांना मिळणार पैठणी साडी; सर्व सहभागी महिलांना आकर्षक भेटावस्तु!

बीड (प्रतिनिधी)

बीडच्या संस्कृतीक, क्रीडा, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात आपले सर्वोपरी योगदान देणाऱ्या शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या संकल्पना मार्गदर्शनाखाली बीड शहरातील महिला-भगिनींच्या अंगी असलेल्या कलागुणांना दर्जेदार व्यासपीठ मिळावे या उदात्त हेतूने दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी सायं ६.०० वाजता रामकृष्ण लॉन्स बीड येथे अमोल जाधव यांच्या वतीने भव्य दिव्य होम मिनिस्टर खेळ पैठणीचा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेमध्ये विजेत्या महिलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले असून विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांक प्राप्त विजेत्या महिलेस फ्रिज, द्वितीय क्रमांक प्राप्त दोन महिलांना प्रत्येकी १ एलसीडी टीव्ही असे दोन एलसीडी टीव्ही, तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्या तीन महिलांना प्रत्येकी १ शिलाई मशीन अशा तीन शिलाई मशीन व त्यानंतर पुढील २१ विजेत्या महिलांना प्रत्येक १ पैठणी अशा २१ पैठणी साडी बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहेत. याबरोबरच होम मिनिस्टर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला संसार उपयोगी आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार असल्याचे संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन स्वतः महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील करणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बीडमधील महिला-भगिनींनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे येऊन आपल्या नाव नोंदणी करावी अथवा योगेश सारूक : ९१३२७३७४७५, अक्षय जगताप :



९७३०३७२२२२, नवनाथ बोबडे : ७०३०५६२५९०, दत्ता ताटे : ९५९५४३४४०५, लक्ष्मीकांत दोडके : ९९२२८३९७५३ यांच्याशी संपर्क साधून ऑनलाईन नाव नोंदणी करावी.

बीडमधील महिला-भगिनीं जास्तीतजास्त संख्येने सहभागी व्हावे- अनिलदादा जगताप

बीडमधील महिला-भगिनींच्या अंगी सुप्त अवस्थेत दडलेल्या कलागुणांना वाव मिळावा याकरिता माझे सहकारी अमोल जाधव यांच्या माध्यमातून होममिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे दि. ५ ऑक्टोबर रोजी रामकृष्ण लॉन्स बीड येथे सायं ६.०० वाजता भव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले आहे. फ्रिज, एलसीडी टीव्ही, शिलाई मशीन, पैठणी साडी तसेच संसार उपयोगी असणाऱ्या भेटवस्तू देखील सहभागी महिलां-भगिनींना देण्यात येणार आहे. अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील हे स्वतः उपस्थित राहणार असून पूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ते स्वतः करणार आहेत. रोजच्या दैनंदिन व्यापातून स्वतःसाठी थोडासा वेळ काढून बीड शहरातील महिलांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या वतीने करण्यात आले आहे.




# अंबाजोगाई शहरात कमरेला गावठी कट्टा(पिस्टल) लावून असलेल्या इसमास

स्था.गु.शा.बीड ने पकडुन एक गावठी गट्टा किं. ४४,०००/- रु चा जप्त केला मुद्येमाल

मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री.उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांनी अवैध धंध्यावर केसेस करण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना अवैध धंद्दे विरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यावरुन दिनांक २७/०९/२०२४ रोजी स्थागुशा येथील पोह/मारुती कांबळे यांना गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहिती आधारे अंबाजागाई शहरात यशवंतराव चव्हाण चौक येथे येथे एक इसम कमरेला गावठी कट्टा लावुन फिरत असल्याची खात्रीशिर बातमी मिळताच स्थागुशा पथक श्री. उस्मान शेख पो.नि.स्थागुशा बीड यांचे आदेशावरुन कारवाईकामी तात्काळ पाचारण होवून यशवंतराव चव्हाण चौकात सापळा लावला तेथे एक इसम संशयीतरित्या मिळुन आला त्याचे नाव अमित उर्फ सोन्या सुंदर गायकवाड रा. सदर बाजार अंबाजोगाई असे सांगितले त्याची झडती घेतली असता त्याचे जवळ एक गावठी बनावटीची पिस्टल व चार जिवंत काडतुस अवैधरित्या मिळुन आले आहे. सदर आरोपीस ताब्यात घेवुन गावठी पिस्टील व जिवत काडतुस कि.अं. ४४०००/- रु मुद्येमाल करण्यात आला असुन पो.स्टे. अंबाजोगाई शहर येथे आरोपी विरुध्द भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदरची कामगिरी मा.श्री. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली ग्रेपोउपनि हनुमान खेडकर, पोह/मारुती कांबळे, राजु पठाण, महेश जोगदंड, तुषार गायकवाड व चालक गणेश मराडे यांनी केली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT